| | |
|---|---|
| आवक क्रमांक | 1543/2018 |
| दिनांक | 4/7/2018 |
| कार्यवाही करिता | |
| शाखा | |
| पोलीस उप-आयुक्त | |

प्रति

मा.पोलीस आयुक्त सो.
पुणे शहर
यांना सादर

प्रतिवेदक :- श्री. गजानन केशव पाटील वय-६७ वर्षे रा.सिंहगडरोड,पुणे

विषय :- आभार विषयक

महोदय,

कारणे विनंती अर्ज सादर करतो की, मी आपले कार्यालयात दि.१५/०१/२०१८ रोजी गणेश गोडसे व इतर ३ इसमांनी मला व माझ्या मुलांस रणजितसिंह पाटील यांस सोर्स कोड ॲप्लीकेशन नावाचे सॉफ्टवेअर विकसीत केलेले असुन त्यापासुन वार्षिक खुप मोठा फायदा होतो अशी थाप मारुन माझे सेवानिवृत्तीचे व शेतीचे एकुण ४० लाख रुपयाची आर्थिक फसवणुक करुन आम्हांस ठगविले होते.

सदर पैशाबाबत त्यांना विचारणा केली असता, ते मला व माझे मुलाला उडवाउडविची उत्तरे देवुन आमचेवरच पोलीस कारवाई करु अशी धमकी देत असे त्यामुळे मी कंटाळुन आपण ज्येष्ठ नागरिकांचे समस्यांसंदर्भात स्थापन केलेल्या ज्येष्ठ नागरिक कक्ष येथे न्याय मिळण्याकरीता विनंती तक्रारी अर्ज दाखल केला होता.

आपल्या कार्यालयातील पोलीस निरीक्षक श्रीमती थोरात मॅडम, बो-हाडे साहेब, जयश्री जाधव मॅडम, घाडुकस्वार साहेब व सोनवलकर साहेब व इतर कर्मचारी यांनी सदर अर्जातील लोकांशी संपर्क करुन त्यांना आपले कक्षात बोलावुन योग्य ती चौकशी,समुपदेशन करुन, कायदेशीर बाबी समजावुन सांगीतल्याने गैरअर्जदार यांनी माझी घेतलेली ४० लाख रुपयांची फसवणुकीची रक्कम मला मिळवुन देण्यास मदत केलेली आहे. सदरची रक्कम मला मिळवण्यासाठी न्यायालयीन चकरा व पैशाचा तसेच वेळेचा अपव्यय न होता आपण स्थापन केलेल्या कक्षामुळे मला लवकरात लवकर मिळाली.

आपण व आपले ज्येष्ठ नागरिक कक्षातील अधिकारी व कर्मचारी यांनी मला केलेल्या मोलाचे सहकार्या बद्दल मी सेवानिवृत्त मेजर (आर्मी) श्री.गजानन केशव पाटील आपला सहश: आभारी आहे. तसेच यापुढे आपले व आपल्या ज्येष्ठ नागरिक कक्षातील अधिकारी कर्मचारी यांचे कडुन पुणे शहरातील ज्येष्ठ नागरिकांना योग्य न्याय मिळवुन द्यावा व पोलीसांची प्रतिमा जनमानसात आपलेशी वाटेल असे कार्य आपले कडुन घडो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे
दा.क्र.:- 03/07/2018

Dcp Cyber.

आपला विश्वासु